# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७१ वा ❑ मंगळवार दि.२१ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा एक प्रेरणादायी उपक्रम

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

राज्यात बोगस शिक्षक भरतीचे प्रकरण ऐरणीवर असतानाच आता शिक्षण विभागाने आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा एक प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे. राज्यभरातील गुणवत्तापूर्ण अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळांची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय, आयडॉल शाळांची बँक करण्यात येणार असून, आयडॉल शिक्षक आणि शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेतले जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे शिक्षक आणि शाळांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थी आणि पालकांना करून देण्यासाठी आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा ही संकल्पना हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत निवड करण्यासाठी शाळांमधील विविध उपक्रम, नवीन अध्ययन पद्धती, शासकीय ध्येय-धोरणांची अंमलबजावणी, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळामधील भूमिका अशा निकषांच्या आधारे आयडॉल शिक्षक आणि आयडॉल शाळा यांची निवड केली जाणार आहे. शिक्षकांची आचारविचाराची पद्धत, विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती, शिष्यवृत्ती, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उच्च शिक्षणातील सहभाग अशा निकषांवर समितीने शिक्षक आणि शाळांचे मूल्यमापन करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

आयडॉल शिक्षक, शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचेही नियोजन आहे. त्यानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व अन्य संस्थांनी आयडॉल शिक्षकांना 'मास्टर ट्रेनर' म्हणून घ्यावे, आयडॉल शाळांना भेटीचे नियोजन करावे, या शाळांमधील शिक्षकांना आणि अन्य सक्रिय सदस्यांना पालिकांच्या शाळांमध्ये अध्यापन मार्गदर्शक म्हणून घ्यावे, आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा यांच्या कामाचे चित्रीकरण, कागदपत्रे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी वेळोवेळी करावे, त्यांच्या कामाचा प्रचार करावा, आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा यांचे गट संमेलन, परिषदांमध्ये उद्बोधन ठेवणे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

शालेय शिक्षण विभागाच्या या स्तुत्य निर्णयामुळे व उपक्रमामुळे शाळांचा गुणात्मक दर्जा तर सुधारणारच आहे याशिवाय शिक्षकांमध्ये देखील कौशल्यपूर्ण अध्यापन करण्याचे तंत्र विकसित होईल.या उपक्रमामुळे शिक्षकांना प्रेरणा मिळेल. आज ग्रामीण भागासह शहरी भागातील काही शाळा मध्ये भौतिक सुविधा, विषयानुसार शिक्षकांची नियुक्ती, कौशल्यपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न शिक्षक पालक सभा, वार्षिक स्नेहसंमेलने व इतर शाळेयेत्तर कार्यक्रम आयोजित केले जात असले तरी बहुतांश शाळांमध्ये या कार्यक्रमांची वानवा जाणवते. काही शाळा कागदावर असे कार्यक्रम दाखवत असतात. आजही महाराष्ट्रातील बहुतांश शाळांजवळ भौतिक सुविधा नाही शाळेला इमारत नाही.अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर ऐरणीवर येत असतो. काही शाळांच्या भिंती काही व शाळांचे स्लॅब पडून विद्यार्थ्यांचा मृत्यू देखील झालेला आहे. शालेय शिक्षण विभागाने विविध उपक्रम हाती घेतले तर शाळांचा दर्जा सुधारण्याला व चांगल्या शाळांसोबत स्पर्धा करण्याला वाव मिळेल. काही शाळांमध्ये तज्ञ शिक्षक आहेत आपल्यातील कलागुणांमुळे त्यांनी नावलौकिक मिळविलेला आहे. विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात व उच्च शिक्षण घेण्यात शिक्षकांनी हातभार देखील लावलेला आहे. अशा कौशल्य युक्त शिक्षकांना खरंतर एक व्यासपीठ पाहिजे असते. अशा शिक्षकांच्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थी व समाजासाठी निश्चितच होत असतो. शालेय शिक्षण विभागाच्या आयडॉल शिक्षक या उपक्रमामुळे अशा शिक्षकांना निश्चितच वाव मिळेल.. एक चांगली संधी मिळेल.

आजही अनेक शाळांमध्ये उच्च विद्या विभूषित शिक्षक आहेत. त्यांच्या ज्ञानाचा त्यांच्या कौशल्याचा फायदा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने निश्चितच उपयोगाचा आहे. परंतु अशा शिक्षकांना संधी मिळत नसते. शालेय शिक्षण विभागाच्या या उपक्रमामुळे अशा शिक्षकांना पुढे जाण्याचा मार्ग आता सुकर होणार आहे.

राज्यातील काही शाळा निश्चितच आयडॉल आहे. काही शाळांमध्ये तंत्रस्नेही शिक्षक आहे .शाळांच्या इमारती, भौतिक सुविधा, तंत्रज्ञानयुक्त शिक्षण, भव्य दिव्य प्रयोगशाळा, मुलांसाठी खेळांचे मैदान, शालेय शिक्षण विभागाचे नियमांचे काटेकोरपणे पालन, पालक शिक्षक सभा, विद्यार्थ्यांची वर्षातून दोनदा वैद्यकीय तपासणी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र टॉयलेटची व्यवस्था, संगणक व्यवस्था, जनरेटरची सुविधा, विद्यार्थ्यांसाठी वाचनालय विविध सुविधा आहेत अशा विविध सुविधांमुळे काही शाळांनी आपली ख्याती कायम राखली आहे. अशा शाळा आता आयडॉल शाळा म्हणून घडल्या जाणार आहे.

# कवी, साहित्यिकांनी रडणारं नव्हे तर भिडणारं लिहावं !

## मुद्रा साहित्य मंचच्या पुरस्कारप्रसंगी कवी सुनील उबाळे यांची भावना

**ज्योतिर्मय 📖 सराहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – माझ्या कवितेला गॉडफादर नाहीये. सर्वसामान्य कामगार, कष्टकरी, श्रमिकांच्या पाठबळावर माझ्या कवितांचा प्रवास सुरू आहे. उलट्या कडीचे घर या काव्यसंग्रहाला मिळालेला हा पुरस्कार म्हणूनच माझ्या एकट्याचा नसून, समकालीन लिहिणारे मित्र आणि माझ्या आजीचा झालेला सन्मान आहे, असे मत प्रख्यात कवी सुनील उबाळे यांनी येथे व्यक्त केले.

जालना येथील मुद्रा साहित्य मंचतर्फे सुभद्राबाई काळे राज्यस्तरीय काव्य पुरस्कार सुनील उबाळे यांना शनिवारी, १९ रोजी प्रसिद्ध साहित्यिक रेखा बैजल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना उबाळे बोलत होते. अध्यक्षस्थानी मुद्रा साहित्य मंचचे अध्यक्ष भास्करराव आंबेकर होते. भास्कर दानवे, रमेश देहेडकर, बंडू काळे, कैलास भाले, सुहास पोतदार, सुनील लोणकर, डॉ. राज रणधीर, एकनाथ शिंदे, कृष्णा कदम, गणेश खरात यांच्यासह अनेक साहित्य रसिक आणि कवींची यावेळी उपस्थिती होती.

**कवितेला मायेचा ओलावा**

बैजल म्हणाल्या, सुनील उबाळे हा व्यवस्थेशी भिडणारा सजग कवी आहे. तो कष्टकऱ्यांच्या नोंदी टिपत राहतो. त्यातून त्याच्या कविता जन्माला येतात. सुहास पोतदार म्हणाले, सुनीलचा उलट्या कडीचं घर हा कविता संग्रह प्रत्येक माणसाला आपला वाटणारा आहे. त्यामुळे त्याच्या कवितांना मायेचा ओलावा आहे. राजेंद्र भोसले यांनी सूत्रसंचलन, तर बंडु काळे यांनी आभार मानले.



# फुले-आंबेडकरी वाङ्.मयकोशाला केवळ एका भाषेपुरते मर्यादित ठेवता येणार नाही, डॉ. मुस्तजीब खान यांचे मत

**ज्योतिर्मय 📖 सराहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – आजच्या काळात पुस्तक उघडून बघण्याची सवय संपत चाललेल्या आणि विज्ञान, तंत्रज्ञान, मोबाईल, इंटरनेट, एनसायक्लोपीडिया, ब्रिटानिका सारख्या अनेक ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध असणाऱ्या काळात फुले-आंबेडकरी कोश संशोधक तसेच अभ्यासकांसाठी या कोशाची निर्मिती वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. मुस्तजीब खान यांनी शनिवारी, १९ रोजी येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद आयोजित फुले-आंबेडकरी वाङ्.मयकोश : चर्चा आणि चिंतन या विषयी बोलताना खान बोलत होते. मसापमध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध समीक्षक ऋषिकेश कांबळे होते. फुले-आंबेडकरी




वाङ्.मयकोशाचे संपादक डॉ. महेंद्र भवरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. सुनीता सावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. खान पुढे म्हणाले, वाङ्.मयकोशात संपूर्ण वाङ्.मयाची एकूणच ऐतिहासिक पार्श्वभूमी डोळ्यासमोर ठेवून या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली असून, हा फुले-आंबेडकरी वाङ्.मयकोश हा नक्कीच संशोधन आणि अभ्यासासाठीचा पाया ठरतो. त्यामुळे या कोशाला केवळ एका भाषेपुरते मर्यादित न ठेवता या वाङ्.मयकोशाच्या सीमा सगळ्याच भाषांसाठी खुल्या कराव्यात, असे खान म्हणाले.

सुरुवातीस प्रसिद्ध संशोधिका डॉ. सुनीता सावकर म्हणाल्या, कोणत्याही समाजात आत्मभान निर्माण झाल्याशिवाय वाङ्.मयकोश निर्माण होवू शकत नाही. कारण फुले-आंबेडकरी वाङ्.मय कोशातील मूलगामी नोंदी ह्या पुढील चळवळीला पोषक असा साहित्य ठेवा आहे. महाराष्ट्रातील विविध घटना घडोमोडींची नोंद या कोशात असल्यामुळे या वाङ्.मय कोशाला मोठा इतिहास प्राप्त झाला आहे. अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केला.

याप्रसंगी प्रसिद्ध विचारवंत डॉ. जयदेव डोळे, सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिंवसरा, कवी राम दुतोंडे, डॉ. अशोक इंगळे, डॉ. भास्कर पाटील, डॉ. किशन मोरे, डॉ. बाळासाहेब लिहिणार, श्रीधर नांदेडकर , डॉ. धनंजय रायबोले, डॉ. सतीश वाघमारे, धनराज गोंडाणे आदी उपस्थित होते. ग्रंथाच्या संपादक मंडळ सदस्य प्रा. ज्ञानेश्वर कांबळे यांनी सूत्रसंचलन, तर डॉ. मोहन सौंदर्य यांनी आभार मानले.

## लक्षवेधी छायाचित्र....



झेब्रा क्रॉसिंगXXX..... आफ्रिकेतील जंगलातून

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

# दि. २२ ते २४ एप्रिल भवानी माता यात्रा उत्सव




**ज्योतिर्मय 📖 सराहित्य**

**मुकुंदवाडी गाव छत्रपती संभाजीनगर** – सालाबादप्रमाणे मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर येथील भवानी माता यात्रा २५३ वर्षांची परंपरा असलेल्या भवानी माता यात्रे निमित्त दि. २२/०४/२०२५ ते दि. २४/०४/२०२५ विविध कार्यक्रमांचे आयोजन मुकुंदवाडी गाव यात्रा कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.

दि २२/०४/२०२५ सायंकाळी ५ वाजता नवसाच्या बारागाड्या ओढणे रात्री ९:०० वाजता भवानी मातेची मिरवणुक रात्री १०:०० वाजता पारंपारिक छंदबाजी तमाशा, दि २३/०४/२०२५, सायंकाळी ५ वाजता भंडाऱ्याचा कार्यक्रम भवानी माता मंदीर रात्री, ७:०० वाजता जाहीर हरि किर्तन सोहळा रात्री ८:०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम यात्रा मैदान दि २४/०४/२०२५, सायंकाळी ५:०० वाजेपासून भव्य कुस्त्याची दंगल एकुण बक्षीस रक्कम ।। लाख रूपयांची जंगी लुट. अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन मुकुंदवाडी गाव यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे

तरी जास्तीतजास्त भविकांनी या यात्रेचा लाभ घ्यावा असे आवाहन भवानी माता यात्रा कमिटी मुकुंदवाडी गाव छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.




– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## तणावग्रस्त जीवनामुळे शारीरिक व्याधी


**ज्योतिर्मय साहित्य**

तुम्हाला ज्या बाबी अनेक दिवस, काही आठवडे किंवा त्याहूनही अधिक काळ त्रास देत असतील, तर तुमच्या मनात नकारात्मक विचार येत आहेत हे निश्चितच सत्य आहे. नकारात्मक विचारांमुळे तुम्ही उदास आणि चिंताग्रस्त होऊ लागता. राग ही देखील एक नकारात्मक भावना आहे ज्यामुळे आपल्या आरोग्यावर आणि मानसिकतेवर सर्वात मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते.विशेषत: रागावर सहजपणे नियंत्रण न मिळवू शकणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत ते प्रकर्षाने जाणवते.

तीव्र वेदना आणि जुनाट आजार असलेल्या लोकांमध्ये रुमिनेशन सामान्य असू शकते, त्या वेदनांबद्दल नकारात्मक विचारांचे रूप धारण करणे आणि त्यातून बरे होणे हे देखील शक्य होऊ शकते. सामान्यांमध्ये तणावग्रस्ततेमुळे डोकेदुखी, मायग्रेन, सायनसवर परिणाम करणारी परिस्थिती आणि कानाचे संक्रमण यांचा समावेश होतो. असामान्य किंवा गंभीर डोकेदुखी, रक्तदाब हे कधीकधी गंभीर वैद्यकीय स्थितीचे लक्षण असते.

काहीवेळा अगदी सामान्य सर्दी, थकवा, तणाव, भूकेने होणारी व्याकुळता, झोपेची कमतरता, अगदी ऍलर्जीमुळे तुम्हाला उदासीनता येऊ शकते, त्यामुळे नकारात्मक विचार येतात. अशा प्रकारच्या अनेक कारणांमध्ये, नैराश्य हे नकारात्मक विचारांमुळेच उद्भवू शकते. सामान्य नकारात्मक संदेशांची काहीजण स्वतःच वारंवार पुनरावृत्ती करत असतात. काहीवेळा त्यांचे विचार असे असतात कि, ‘‘मी स्वतःच एक धोकादायक व्यक्ती आहे‘‘, ‘‘मी एक पराभूत व्यक्ती आहे‘‘, ‘‘मी कधीही काहीही बरोबर करत नाही‘‘, ‘‘कोणीही मला कधीही आवडणार नाही‘‘,मी एकमेव असा आहे कि जो अविचाराने वागतो‘‘. बहुतेक व्यक्ती या स्वरूपातील नकारात्मकता निर्माण करणाऱ्या विचारांवर, संदेशांवर, ते कितीही असत्य किंवा अवास्तव असले तरीही विश्वास ठेवतात.

## अनोखे अंदमान




**ज्योतिर्मय साहित्य**


स्वातंत्र्यवीर सावरकरांना ज्या कोठडीत ठेवण्यात येत असे तिचे वर्णन तर वर केले आहेच. अनेक क्रांतिवीरांची अवस्था अशीच होती. पंजाब, बंगाल आणि महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारक या ठिकाणी इंग्रजांनी काळ्यापाण्याची शिक्षा म्हणून आणून ठेवले होते. सगळ्यांच्या कोठड्यांमध्ये राहण्यासाठी अपुरी जागा होती. एकटेपण तर कायम सोबतीला होते. आपण तोंडात अन्नाचा एखादा घासही घेणार नाही असे निकृष्ट प्रतीचे अन्न दिले जाई. त्या कोठड्यांमध्ये नैसर्गिक विधीसाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. रात्रीच्या वेळी कैद्यांना फक्त एक मातीचे भांडे दिले जाई. त्यातच त्यांना मूत्रविसर्जन करावे लागे. शौचविधीसाठी सुद्धा कोणतीही वेगळी व्यवस्था नव्हती. त्यासाठी एक तर सकाळपर्यंत थांबावे लागे. किंवा जर कोठडीतच ते विधी करावे लागले तर ते साफ करण्याची जबाबदारी पुन्हा कैद्यांवरच येई. रात्रीच्या वेळी डास, मच्छर, पिसवा त्रास देत असत. झोप लागली किंवा नाही लागली तरी सकाळी उठून काम करावे लागत असे. असे सगळे कष्ट आणि यातना आपल्या देशभक्तांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सोसल्या त्यांची नुसती आठवण आली तरी अंगावर शहारा येतो. त्यांनी केलेल्या या कष्टाची जाणीव आज क्वचितच दिसते.




याच परिसरात संध्याकाळच्या वेळेला लाईट अँड साऊंड शो चे आयोजन केले जाते. त्यावेळी या सेल्युलर जेल चा इतिहास अक्षरशः जिवंत होतो. हा शो आम्ही पाहिला आणि अक्षरशः थरारून गेलो. कारण तिथे होणारा लाईट अँड साऊंड शो ऐकणं आणि पाहणं हा एक अनोखा अनुभव होता. अंधार पडल्यानंतर प्रकाशाच्या झोतात एक-एक कोठडी उजळत होती आणि मागे ऐकू येत होता तो एक गंभीर आवाज:

‘‘मी आहे सेल्युलर जेल मी पाहिलं आहे रक्त, पाहिलं आहे बळ, आणि ऐकल्या आहेत मौनातील किंकाळ्या‘‘

स्वा. सावरकर, बटुकेश्वर दत्त, डेव्हिड बॅरीसारखे उन्मत्त इंग्रज अधिकारी, उपोषण करणारे कैदी या सगळ्यांचं जणू पुन्हा दर्शन होतं. हा शो केवळ माहिती देत नाही, तो इतिहास अनुभवायला लावतो. या साऊंड शो मध्ये नासिरुद्दीन शहा, ओम पुरी, टॉम अल्टर यासारख्या दिग्गज कलाकारांचे आवाज वापरल्यामुळे तो अत्यंत प्रभावी झाला आहे. **(क्रमशः)**




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (अ)

**ज्योतिर्मय साहित्य**


संसारी माणसाच्या जीवनातील चढ उतार या समासात पहायला मिळतात. आपल्या भारतीय कुटुंब संस्थेत आईवडील, बंधूभगिनी बायको मुलं मुली व सर्व गणगोताचा समावेश होतो. लग्नाच्या आधी आईवर प्रेम करणारा मुलगा लग्न झाल्यावर एकदम बदलतो. आणि हा निसर्ग नियम आहे. प्रापंचिक माणूस मुलत:स्वार्थी असतो. स्वार्थाची अंगेतीच असल्याने त्यातुन जन्म पावणा-र्या समस्या सर्वकाळ सदासर्वदा सर्वसमाजात सारख्याच असतात. स्वार्थ साधण्याचे मार्ग मात्र त्या त्या काळच्या विज्ञान प्रगतीवरव एकंदरीत अवलंबून असतात. या समासात मातेच्या ऊदरातुन जन्म घेतल्या पासून लग्न होई पर्यन्तचा सामान्य माणसाच्या विचारांचे कंगोरे अभ्यासायला मिळतात. समर्थानी ६५ ओव्या मध्ये याचे वर्णन केले आहे. आजही प्रश्न तेच आहेत. मुलगा लहानपणी आई शिवाय जगु शकत नाही व बायको आल्यावर आई अडगळ वाटते.

एका स्त्री साठी त्याने तन, मन, धन वाहून जन्मदात्या मातेला तुच्छ वागणूक दिली. भक्ति सोडली, विरक्ति सोडली इतकेच नाही तर सायुज्यमुक्ति देखील स्त्री पुढे तुच्छ मानली.सगळे ब्रम्हांड कमी योग्यतेचे वाटले सगळे नातेवाईक त्याला शत्रू प्रमाणे वाटू लागले. अशा प्रकारे ऐका स्त्री साठी तो आपले आयुष्य बरबाद करतो. काही कारणाने ती मरण पावते तेव्हा तो वेडापिसा होतो. मग परत दुसरं लग्न करतो. समर्थानी या समासात पुरुष एका स्त्रीसाठी कसा

सर्वस्वाची होळी करून घेतो याचे वर्णन समर्थानी अगदी सहज सोप्या पध्दतीने सांगितले आहे. तेव्हा आपण सर्वांनी या समासात काय शिकायचे तर कुणाच्या ही जास्त आहारी जाऊ नका स्त्रियांनी व पुरूषांनी मर्यादा पुरूषोत्तम प्रभु रामरायाचा आदर्शसमोर ठेवावा. हे या समासातील विचार आहेत. तुम्ही आम्ही सगळ्यांनी नितीधर्माचे आचरण करून जगावे.

अधर्माने न वागता मनुष्य जन्माचे सार्थक करावे.
इति श्रीदासबोधे गुरूशिष्य संवादे
स्वगुणपरिक्षानाम समास दुसरा समाप्त.
श्री राम जय राम जय जय राम श्री स्वामी समर्थ।। **(क्रमशः)**

## शंका न ठेवता नाम घ्यावे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

नामस्मरण करायला सांगितले की लोक सबबी सांगतात. पण खरोखर, नामस्मरण करण्याच्या आड काहीच येत नाही. काम करीत असतानासुद्धा उगाचच इतर विचार मनात येतातच ना ? मग तसेच नामस्मरण करायला कोणती अडचण आहे ? उगाच दुसरे विचार करण्यापेक्षा भगवंताचे नाम घ्यावे हे बरे नाही का ? वेळ सापडताच तो व्यर्थ गप्पागोष्टीत न घालविता नामस्मरण करावे; श्रद्धा ठेवून करावे. दोन प्रवासी पायी जात होते. त्यांना भूक लागली. जाताना एक आंबराई लागली. त्यांनी मालकाला विचारले, ‘आंबे घेऊ का ?’ मालक म्हणाला, ‘पंधरा मिनिटांत जितके आंबे खाता येतील तितके खा.’ दोघांपैकी एक होता, तो मालकाजवळ चौकशी करू लागला; या शेताला पट्टी किती, मालक कोण, वगैरे पुष्कळ विचारपूस करू लागला. दुसरा मात्र भराभर आंबे खाऊ लागला. इतक्यात पंधरा मिनिटे झाली. मालकाने सांगितले, ‘वेळ संपली, आता तुम्ही जा.’ एकाचे पोट भरले, दुसरा मात्र उपाशी राहिला. या गोष्टीवरून हे ध्यानात घ्यायचे की, नुसते प्रश्न विचारण्यापेक्षा, श्रद्धा ठेवून नाम घेऊ लागावे. नामाचा अर्थ आपल्याला जरी कळला नाही, तरी तो भगवंताला कळतो. म्हणून नामाचे महत्त्व कळो वा न कळो, नाम घेत राहावे. ध्रुवाने काय केले ? नारदवचनावर विश्वास ठेवून नामस्मरण प्रेमाने करू लागला. तो इतर विचारांच्या, शंकाकुशंकांच्या नादी लागलाच नाही. ‘एक तत्त्व नाम’ हेच त्याने धरले, म्हणून त्याला नारायण प्रसन्न झाला. संत नि:स्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवावी आणि नाम घ्यायला सुरुवात करावी आणि अखंड नामातच राहावे.

नाम किती दिवस घेत राहावे ? नाम सोडावेसे वाटत नाही तोपर्यंत ते घ्यावे. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे. नामस्मरणात रंगला की नाम सुटणारच नाही. भगवंताचे नाम हेच श्रेष्ठ आहे. त्या नामात रंगेल तोच खरा. चरित्र विसरले तरी चालेल पण नाम विसरू नये, कारण नामात सर्व चरित्र साठविलेले आहे. ज्ञान, उपासना, कर्म वगैरे मार्ग आहेत, पण सर्वांत नामस्मरण हे सोपे साधन आहे. एक मोठा किल्ला होता. तो अभेद्य होता. मुंगीलाही आत प्रवेश होणे अशक्य असा तट होता. पण त्याला एक मोठा दरवाजा होता. त्याला एक मोठे कुलूप होते. एकाला त्याची किल्ली मिळाली; मग प्रवेश सुलभ झाला. तसे नाम ही किल्ली आहे. परमार्थ कितीही कठीण असला तरी नामाने तो सुसाध्य असतो. नामावर प्रेम आणि श्रद्धा बसत नाही अशी तक्रार करतात. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे, त्यानेच समाधान होईल.


आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्या वाचून अडून बसू नये.

## ॥ संत - महात्म्य ॥

**संकलन : मधुकर बोरीकर**
**9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)**

## संत श्रेष्ठ श्री तुलसीदासजी

**ज्योतिर्मय साहित्य**



त्यांच्या प्राण प्रिय पत्नीच्या या एका वाक्यांनिशी तुलसीदास घायाळ झाले. त्यांचा प्रपंचाचा मोह क्षणात नष्ट झाला. त्यांचेत वैराग्य बळावले ,त्यांना उपरती झाली व त्याच क्षणापासून त्यांनी स्वतःला भगवंताचे भक्तीत झोकून दिले.

एकदा तुलसी दासजी यांची वरील प्रेरक कथा मी माझे बँकेतील मित्रास ऐकवत होतो. ते म्हणाले त्यांच्या जीवनात पत्नीच्या निर्भत्सने मुळे असा प्रसंग आला म्हणून ते सावरले.

यावर मी असे म्हणालो की, आपल्या जीवनात असे उपेक्षेचे,अपमानाचे, निर्भत्सनेचे प्रसंग काय कधीच आले नाहीत? असे प्रसंग वेगवेगळ्या रूपात प्रत्येकाच्या जीवनात येतातच.

तुलसीदासजी यांच्या सारखा करोडो लोकांमधून एखादाच जो त्याच क्षणी सावरला,त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला स्वतः मध्ये त्यांनी अमुलाग्र बदल करविला वा ते या श्रेष्ठ पदावर पोहोचले.

आपल्या सारखे असे प्रसंग येऊनही लोचटासारखे संसारास पुन्हा चीटकून रहातो.

प्रभू श्री रामचंद्राची निसिम भक्ती करीत असताना, त्यांची राम कथा अनेकांना आवडायला लागली. काशी येथे ते ज्या घाटावर बसून कथा सांगायचे, त्यास तुलसी घाट हे नाव नंतर पडले.

एकदा त्यांची कथा ऐकत असताना एका पिषाच्यास मुक्ती मिळाली. त्या पिशाच्याने तुलसीदास यांना असे सांगितले की, तुमची कथा ऐकण्यासाठी येथे प्रत्यक्ष हनुमान जी नित्य येत असतात. आणि खुणेने त्या पिशाच्याने हनुमंताकडे अंगुली निर्देश करून त्यांना त्यांचे दर्शन घडविले. तुलसी दासजी, हनुमंत रायाच्या चरणावर नतमस्तक झाले. हनुमंत रायास तुलसीदासांनी अशी विनवणी केली, आणि गळ घातली की, त्यांनी तुलसीदासांना रामरायाचे दर्शन घडवावे. यावर हनुमंत राय म्हणाले की तुला रामरायाचे दर्शन, चित्रकूट येथे होईल.

यानुसार लगेच तुलसीदासजी चित्रकूट येथे आले. मौनी अमावस्या, संवत सोळाशे सात, या तिथीस बुधवारी त्यांना असे दिसले की, दोन राजकुमार जे खूप देखणे आणि मोहक होते, त्यांच्याजवळ धनुष्यबाण घेतलेले होते आणि ते घोड्यावर स्वार होऊन समोर आले आहेत. तुलसीदासजी यां युवकांना पाहून आकर्षित तर झाले, परंतु हेच ते प्रभू रामराय आणि लक्ष्मणजी आहेत हे न ओळखून त्यांनी प्रभू श्रीरामांना प्रणाम केला नाही.

त्यावेळी त्यांच्या पाठीमागे हनुमानजी उभे होते. नंतर त्यांनी तुलसीदासजींना सांगितले की ते दोन राजकुमार हे दुसरे तिसरे कोणी नसून तुम्हाला प्रत्यक्ष प्रभू श्रीराम आणि लक्ष्मणजी यांनी दर्शन दिले होते.

आता तुलसीदाजींना अपराध्या सारखे वाटू लागले. त्यांनी पुन्हा हनुमंत रायांच्या चरणावर दंडवत घातलं, आणि असे सांगितले की, मला एकदा पुनश्च त्यांचे दर्शन करून द्या. यानुसार एकदा बालक रूपात प्रभू राम त्यांचे समोर आले, व त्यांना म्हणाले ‘‘बाबा मला चंदन हवे आहे, तुम्ही ते देऊ शकाल?‘‘ गोड आवाजात बोलणारे हे बालक म्हणजेच प्रभू राम आहेत हे कदाचित तुलसीदासजी ओळखणार नाहीत, असे समजून आता तरी धोका खाऊ नये म्हणून हनुमंत राय एक दोहा उच्चार करीते झाले.

**(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**सन्तप्तायसि संस्थितस्य पयसो नामापि न ज्ञायते**
**मुक्ताकारतया तदेव नलिनीपत्रस्थितं राजते।**
**स्वात्यां सागरशुक्तिमध्यपतितं तन्मौक्तिकं जायते**
**प्रायेणाधममध्यमोत्तमगुणः संसर्गतो जायते ।।**

अर्थ – पाण्याचा थेंब तापलेल्या लोखंडावर पडल्याने त्यांचे नावही शिल्लक राहत नाही. तोच थेंब कमळाच्या पानावर पडला, तर दवबिंदूच्या रूपात मोत्याचा आकार धारण करतो. तसेच स्वाती नक्षत्रसमयी समुद्राच्या शिम्पल्याच्या मुखात तो थेंब पडला, तर त्या पासून मोती उत्पन्न होतो. बहुतेक करून संगतीमुळेच कनिष्ठ, मध्यम आणि उत्तम गुण प्राप्त होतात.

‘‘सुसंगती सदा घडो। सुजनवाक्य कानी पडो।।’’ या उक्तीप्रमाणे मनुष्याच्या विकासाच्या प्रक्रियेत संगतीचे कसे महत्व आहे, हे या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरी उदाहरणांसह समजाऊन सांगतात. पाण्याचा थेंब तोच असतो, पण तो तप्त तव्यावर पडतो आणि त्याचे अस्तित्व संपते. तोच थेंब कमळाच्या पानावर पडतो आणि त्याला मोत्याची शोभा प्राप्त होते. पण तोच थेंब योग्य वेळी शिम्पल्यात पडला, तर मोतीच होऊन जातो. म्हणून माणसाची उत्तमता, मध्यमता आणि कनिष्ठता संगतीच ठरवत असते. असा आशय या ठिकाणी अभिव्यक्त करण्यात आला आहे.




## पिस्ते रोज खाल्ल्यास या तीन आजारांपासून बऱ्याच अंशी सुटका मिळू शकते !!

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्याच्या आधुनिक जीवनशैलीशी निगडित असलेले तीन मोठे आजार म्हणजे लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि मधुमेह. हे तीन रोग आज जगासाठी मोठ्या संकटाचे कारण ठरत आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, जगभरात एक अब्जाहून अधिक लोक जास्त वजनाचे किंवा लठ्ठ आहेत. तर १.२८ अब्ज लोक उच्च रक्तदाबाचे बळी आहेत. त्यापैकी बहुतांश गरीब आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांतील आहेत. मधुमेहाच्याबाबतीत बोलायचे झाल्यास च्या मते, ४२२ दशलक्ष लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत.

त्याहून चिंतेची बाब म्हणजे दरवर्षी सुमारे दीड लाख लोकांचा मधुमेहामुळे मृत्यू होतो. म्हणजेच सुमारे ३० दशलक्ष लोक या तीन आजारांनी त्रस्त आहेत आणि या तिन्ही रोगांचे कारण म्हणजे बैठी जीवनशैली. दैनंदिन जीवनात शरीराला हेल्दी ठेवण्यासाठी पिस्ते रोज खाल्ल्यास या तीन आजारांपासून बऱ्याच अंशी सुटका मिळू शकते. पिस्ता हे सुपर हेल्दी फूड आहे.

हेल्दी फॅटसोबतच पिस्त्यामध्ये प्रथिने, फायबर आणि अनेक प्रकारचे अँटिऑक्सिडंट असतात. त्यात असलेल्या आवश्यक पोषक तत्वांमुळे वजन कमी करण्यासाठी आणि हृदयाच्या आरोग्यासाठी हा उत्तम आहार आहे. २८ ग्रॅम पिस्त्यामध्ये १५९ कॅलरीज, ८ ग्रॅम कार्बोहायड्रेट, ३ ग्रॅम फायबर, १३ ग्रॅम हेल्दी फॅट, ६ टक्के पोटॅशियम आणि इतर अनेक पोषक घटक असतात.

बीपी आणि कोलेस्ट्रॉल कमी होते. पिस्त्याचे नियमित सेवन केल्यास हृदयविकाराचा धोका कमी होतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

पिस्त्यामध्ये असलेले उच्च अँटीऑक्सिडंट्स रक्तातील कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब कमी करतात. त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. पिस्त्यावर केलेल्या सर्व अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, त्यामुळे ६७ टक्के एलडीएल किंवा खराब कोलेस्ट्रॉल कमी करता येते.

अशा प्रकारे रक्तातील साखर कमी होते – इतर ड्रायफ्रुट्समध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण जास्त असले तरी पिस्त्यांमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स खूपच कमी असतो. म्हणजे पिस्त्यामुळे रक्तातील साखरही नियंत्रित राहते. एका अभ्यासात असे आढळून आले की, पिस्त्याचे सेवन केल्याने रक्तातील निरोगी साखर वाढते. आणखी एका अभ्यासात असे आढळून आले की, ५६ ग्रॅम पिस्त्याने रक्तातील साखर २० ते ३० टक्क्यांनी कमी होते. पिस्त्यामध्ये असलेले फायबर, अँटिऑक्सिडंट्स, हेल्दी फॅट्स, फिनोलिक कंपाऊंड्स, कॅरोटीनोइड्स यांसारखे घटक रक्तातील साखर पूर्णपणे नियंत्रणात आणतात.

***





**ज्योतिर्मय साहित्य**


वाल्मीक नारदाना विचारतात.या वेळी या जगात गुणवान, धैर्यवान, सत्य प्रतिज्ञ, सामर्थ्य संपन्न, न्यायी, सर्वांना प्रिय असणारा असा कोण आहे? ते नारदास म्हणाले तुम्ही समर्थ आहात. तुम्ही सर्वत्र विहार करता. म्हणून आपल्या कडून आम्हाला हे जाणून घ्यायचे आहे. हे का विचारले? कारण आधले दिवशीच सीता घरी आली होती व ती दुःखी आहे यावरून रामाच्या विषयी त्यांचे मनात विकल्प आला होता. त्यांना रामाचे चरित्र तर माहिती होते, मग पत्नी त्यागाच्या कृतीचा संदर्भ लागत नव्हता.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

नारद म्हणाले सांप्रत काळी असे स्रेष्ठ व्यक्ती हे केवळ श्री रामच आहेत. कर्मनिष्ठ, तपोनिष्ठ कुळात रामाचा जा झाला आहे. असे नारदांनी सांगितले.वाल्मीकींना रामायण सांगून नारद निघून गेले, मग वाल्मीक तमसा नदीवर स्नान करून परतले. सोबत त्यांचा आवडता शिष्य भारद्वाज हा होता.वाल्मिकींनी त्यांचे आन्हीक उरकले. सूर्य उदय होत होता.निसर्ग सौंदर्य खुलले होते. ते हे निसर्ग सौंदर्य डोळे भरून पहात होते.फिरत असताना त्यांना एका झाडावर एक क्रौच पक्षाचे जोडपे दिसले. सौंदर्य दिसण्याची एक दृष्टी लागत असते. वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ सौंदर्य दोन प्रकारात असते. पंढरपूर येथील पांडुरंग दिवसात प्रत्येक वेळी वेग वेगळा दिसतो.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

चारुने आता आपल्या मनाचा एक वेगळाच कप्पा उघडला होता. त्यातील आनंदात ती रममाण होऊ लागली होती. तिला अंमल बरोबर घालवलेले क्षण आठवत होते. तो आपला निरोप न घेता असा अचानक निघून गेला त्याचे तिला वाईट वाटत होते. त्याने आपल्या जाण्याबद्दल तिला मोकळेपणाने सांगितले असते तर तिला त्याचे काही वाटले नसते. तिची अवस्था उदासवाणी झाली. कामात तिच्या चुका होऊ लागल्या.

भूपतीलाही आता या घरात राहणे नकोसे वाटू लागले. घरातील जीवनरस जणू आटून गेला होता. संबंधात एक प्रकारचा शुष्कपणा आला होता. मैसूरला एक नवीन वर्तमानपत्र सुरू होणार होते. तिकडे संपादक म्हणून जाण्याचे त्याने ठरवले. चारूला हे कळल्यानंतर तिने त्याला विचारले की आता परत कधी येणार ? तेव्हा तो म्हणाला, तुला जर एकटं वाटलं तर कळव. मी येईन.

अशा रीतीने एक घरटं, एक संसार उध्वस्त झाला होता. या कथेमधील हा विवाहबाह्य संबंधांचा विषय टागोरांनी इतरही काही कथा कादंबऱ्यांमधून हाताळला आहे. आज आपल्याला विवाहबाह्य संबंधांचे काही विशेष वाटत नाही. आज तर अनेक दूरदर्शन मालिका आणि चित्रपटांमधून या विषयाचेच कथानक दाखवले जाते. परंतु त्या काळात टागोरांनी या विषयाला हात घातला. अर्थातच त्यावेळी त्यामुळे बरीच खळबळ माजली. परंतु यातून काळाच्या पुढे असणारी टागोरांची दूरदृष्टी आपल्याला दिसते.



## जात्यावरच्या ओव्या......

---

### नातेसंबंध : बहिण-भाऊ

भावाला पाहूणचार
मेव्हण्याला नाही केला
टांगा शिवाहून गेला
बहिणीला राग आला ||३८||

भावाला पाहूणचार
भाच्याला करते लाडू ,
वडील भावजयी
तुला ग काय धाडू?? ||३९

---

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# उन्हाची लाही... लाही

ज्योतिर्मय साहित्य

उन्हाळा आला की सृष्टीला जणू एका तप्त छायेत रंगवले जाते. वसंताची कोवळी गारवा संपून, आकाश एकदम निळसर आणि तेजस्वी होतं. उन्हाची ती झळझळीत लाही, कधी अंगावर झोंबणारी, कधी अंगभर उब देणारी, तर कधी मनात एक विशिष्ट शांतता भरणारी भासते. उन्हाची लाही... लाही हा शब्दप्रयोग केवळ उष्णतेचा उल्लेख करत नाही, तर त्यामागे अनेक भावना, आठवणी, अनुभव आणि सौंदर्य लपलेलं आहे...उन्हाळा म्हणजे ताप, घाम, सुकलेली धरती, पण त्याचवेळी आमरसाचे बशा, कडेकपारीत वाळलेली पानं, आंब्याचा दरवळ, भेळ-पाणीपुरीचे ठेले, गार पन्हं, आणि गुलमोहराची सगळी पाने विसरायला लावणारी लालसर सळसळ!

बालपणात उन्हाळा म्हणजे सुट्ट्यांची मजा. शाळा बंद. अभ्यासाच्या वह्यांचे ओझं उतरलेलं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत खेळण्यात रमणं. अंगाला लाही बसो वा झळ, कोणाला काय पर्वा? एखादा काचेचा चेंडू घेऊन माळरानावर क्रिकेट खेळणं, तासन्तास आंब्याच्या झाडावर चढून कैऱ्या तोडणं, आईला चुकवून आंबे खाणं आणि मग पोट दुखणं ही सगळी उन्हाळ्याची मजा होती. उन्हाळा त्यावेळी केवळ ऋतू नव्हता; तो एक सण होता!

तपलेल्या अंगणात आईच्या हातचं आंबट-गोड कैरीचं लोणचं उन्हात वाळायला ठेवलं जायचं. त्या लोणच्याचा सुगंधही उन्हाची आठवण करून द्यायचा. उन्हाळ्यात पंखा, गार पाणी, आणि दिवसभर चालणारी वीज यांची किंमत वेगळीच होती.

वय वाढलं, जीवन बदललं, पण उन्हाची लाही मात्र तशीच राहिली. आता ती काहीशी झोंबणारी वाटते. अंगावर पडणाऱ्या उन्हाच्या प्रत्येक थेंबात एक आठवण असते घरापासून दूर असणं, कधीकाळी घालवलेले गोड दिवस, आणि उन्हाच्या छायेत दडलेले हळवे क्षण.

उन्हाळा जसा तापदायक वाटतो, तसा तो विचारांना प्रवृत्त करतो. शहरातल्या धावपळीच्या जीवनात उन्हाळा म्हणजे गडद सनग्लासेस, बोतलबंद पाणी, आणि ऑफिसमधल्या एसीच्या रुममध्ये बंदिस्त जीवन. पण खिडकीबाहेर जेव्हा सूर्य वेड्यासारखा तळपत असतो, तेव्हा कुठे तरी आतल्या आत एक शांतता निर्माण होते. माणूस स्वतःशी संवाद साधायला लागतो. उन्हाळा म्हणजे शरीराच्या थकव्यासोबतच मनाच्या खोल कप्प्यांमध्ये डोकावण्याची संधी.

कोण म्हणतं उन्हाळा कुरूप असतो? उन्हाच्या लाहीतही एक खास सौंदर्य आहे. जरा डोळे मिटून पहा धुरकट आकाश, वाळलेली पाने, सुकलेली झाडं, पण त्याचवेळी त्या झाडांच्या फांद्या नव्या पालवीची वाट पाहत असतात. उन्हाळा म्हणजे तयारी आहे पावसासाठी, नवजीवनासाठी, पुन्हा एकदा फुलून येण्यासाठी.दुपारच्या वेळी रस्त्यावरून फिरताना झाडांच्या सावलीचा अनुभव घेणं म्हणजे निसर्गाच्या कुशीत विसावल्यासारखं वाटतं. पिंपळाच्या झाडाखाली एखादी म्हातारी



बबलू कराळे
अवधूत नगर जान्हवी निवास दर्यापूर,
जि.अमरावती. मो. ७२१८०२९८३८

बाई निवांत झोप घेताना दिसते, तर कुठे रस्त्याच्या कडेला गार गार पन्हं विकणारा एक गरीब पण हसरा चेहरा. उन्हाळ्याच्या ह्या चित्रफितीतील प्रत्येक फ्रेम एका वेगळ्या अर्थाने न्हालेली असते...

कधी कधी असं वाटतं की उन्हाची लाही म्हणजे आयुष्याची चव आहे. गारवा जसा सुखावतो, तशीच लाही झुरवते पण झुरणेही तर कधी कधी आवश्यक असतं. त्यातूनच मन घडतं, आयुष्य सुसंस्कृत होतं.भारतीय संस्कृतीत उन्हाळ्याला एक खास स्थान आहे. बहुतेक सण आणि धार्मिक उत्सव उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवरच साजरे होतात रामनवमी, हनुमान जयंती, अक्षय तृतीया. या सगळ्यांत एक प्राचीन ऊर्जा आहे, जी उन्हाच्या तापामध्ये न्हालेली असते.गावाकडं उन्हाळा म्हणजे वड्यांवर रात्रीची चटई, उघड्या आकाशाखाली झोप, आणि रात्री गार वाऱ्याची गोड झुळूक. हे अनुभव शहरी जीवनात हरवत चालले असले, तरी आठवणीत ते कायमचे जिवंत राहतात... उन्हाळा जितका तापदायक, तितकाच तो पावसाच्या आगमनाचा संकेत देतो. उन्हाच्या प्रत्येक थेंबामागे लपलेला असतो एक थेंब पावसाचा जो फक्त प्रतीक्षेत असतो. पानगळीच्या या ऋतूनंतर जेव्हा पावसाची पहिली सर येते, तेव्हा त्या टाकाऊ वाटणाऱ्या उन्हाच्या दिवसांनाही एक नवं महत्त्व प्राप्त होतं. कारण पावसाचा गंधही उन्हाळ्याच्या तप्त मातीवरूनच उगम पावतो. म्हणूनच उन्हाची लाही लाही ही एक वाट आहे नवजीवनाकडं, नवसृजनाकडं. उन्हाची लाही केवळ शरीरावर पडणारी झळ नाही, ती मनाला तपवते, आठवणींना उजाळा देते, आणि जीवनाकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी देते. या लाहीत काहीतरी पिळवटणं असतं पण त्याच पिळवटण्यातून नवा सूर फुटतो. त्यातूनच जन्मतो तो पहिला सृजनाचा क्षण जेव्हा तप्त पृथ्वी पावसाचा थेंब अलगद सामावून घेते. उन्हाळा येतो, झळ देतो, थकवतो पण न थकता चालण्याची ताकदही त्याच लाहीतून मिळते. म्हणूनच ती लाही लाही आयुष्याचा एक अलवार हळवा भाग आता बनली आहे...

# सूर्याचीवाडी शाळेतील मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम

ज्योतिर्मय साहित्य

**मायणी** – जिल्हा परिषद शाळा सुर्याचीवाडी या शाळेतील मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. दिपाली काळे, उपाध्यक्ष राहुल इंदलकर सूर्याचीवाडी गावच्या सरपंच सौ अनिताताई जाधव, उपसरपंच लालासो जगदाळे, सर्व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व माजी उप सरपंच रामचंद्र घोलप, मुख्याध्यापिका सौ.रत्नाबाई माळवे, पोलीस पाटील सौ. अश्विनी इंदलकर, पायोनियर फाउंडेशनचे घाडगे साहेब व अश्विनी शिंदे, अंगणवाडी सेविका सौ. जयश्री काळे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमांमध्ये शाळेतील २२ मुलांनी २७नृत्यासह वेगवेगळ्या कला सादर केल्या. त्यामध्ये भारुड, बालनाटिका, वासुदेवाचे गाणे,



इंग्रजी संवाद, लेक वाचवा अभियान अशा जनजागृती करणाऱ्या अनेक गोष्टींचा या कार्यक्रमांमध्ये समावेश करण्यात आला होता. अंगणवाडीतील बालचमूनिही यात सहभाग घेतला होता. या सर्व बालकलाकारांना धोंडेवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय रफिक मुलाणी साहेब, भारत माता विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार पिसाळ सर , खटाव तालुका प्राथमिक शिक्षक समितीचे तालुकाध्यक्ष मा. रमजान इनामदार सर, शिक्षक बँकेचे माजी संचालक चंद्रकांत मोरे सर, त्याचबरोबर जिल्हाकोर्ट रजिस्टर गोरखनाथ बागडे साहेब यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून मुलांना शुभेच्छा दिल्या.

गावातील सर्व ग्रामस्थांचा यामध्ये उत्स्फूर्त सहभाग होता. या बालचमूचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सौ. रंजना सानप मॅडम व सौ रत्नाबाई माळवे, यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्याचबरोबर श्री श्रीमंत जगदाळे, अरविंद गायकवाड व अंगणवाडी सेविका सौ. जयश्री काळे व सौ निकिता गोरवे यांचेही या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या ११

ज्योतिर्मय साहित्य

काही प्राणी, पक्षी असे असतात की ते आवडतात की त्यांची भीती वाटते हेच कळत नाही. मी लहान असताना आम्ही ज्या वाड्यात रहात होतो, त्या वाड्याच्या मागच्या दारातून बाहेर पडले की फुलझाडे, फळांची झाडे, पिंपळ वड या सारखी मोठी झाडे दिसायची. वाड्याच्या बाहेर पडल्या पडल्या लगेच एक पिंपळाचे झाड होते. त्यावर इतकी वटवाघळे असायची की पाने जास्त की वटवाघळे जास्त अशी शंका यायची. त्याला सगळे पिंपळाचे झाड न म्हणता वटवाघळाचे झाड म्हणत होते. आणि आम्हा लहान मुलांना त्याचे फार कुतुहल वाटायचे. ती उलटी कशी लटकतात? सारखे पंख का हलवतात? इतक्या छोट्या देहाला इतके मोठे पंख कसे? ती दिवसा झोपतात का? रात्रीच कशी उडून जातात? पुन्हा त्याच झाडावर परतून कशी येतात? असे बरेच अनुत्तरित प्रश्न पडायचे. ते सगळे अंधार पडायला लागला की विशिष्ट आवाज करुन एकदम उडायची. अगदी अंधारून आल्यासारखे वाटायचे. रात्री झाड त्यांच्या शिवाय मोकळा श्वास घेत असावे. आम्ही ते रिकामे झाड बॅटरी लावून बघत होतो. पुन्हा पहाटे हे सगळे पुन्हा आपापल्या जागेवर लटकताना दिसायची. पण त्यांनी कधी कोणाला इजा केली असे कधी दिसले नाही. त्यांच्या विषयीच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे जसे मोठे होत गेलो तसे वाचन,अभ्यास यातून मिळाली. आणि निसर्गात काय काय चमत्कार असतात याची जाणीव झाली.

तसेच दुसऱ्या एका झाडावर एक वटवाघूळ दिसायचे. त्याच्या विषयी तर खूप अंधश्रद्धा व अफवा ऐकल्या होत्या. कोणीतरी सांगितले होते, आपण त्यांना दगड मारला की, तो दगड ते चोचीत धरुन उगाळते आणि तो दगड झिजेल तसे आपण झिजतो. आम्हा मुलांना काहीतरी कारण हवेच असायचे. मग आम्ही सगळे मिळून त्याला छोटे दगड मारत असू. सगळ्यांनी मिळून एवढ्यासाठी, की कोणता दगड कोणी मारला हे घुबड कसे लक्षात ठेवणार?

पण त्याने एकही दगड झेलला नाही. आणि ती दंतकथा किंवा अफवा आहे हे लक्षात आले. मग आम्ही सगळ्यांनी त्याचे निवासस्थान शोधून काढले. एका झाडाच्या ढोलीत त्याचे घरटे आणि त्यातील छोटी छोटी गोंडस पिल्ले दिसली. मोठे झाल्यावर तर फेंगशुई व वास्तूशास्त्र वाचताना असे समजले की घुबड शुभ असते. त्यांच्या कडून सकारात्मक ऊर्जा मिळते. त्याचे चित्र किंवा पुतळा घरात ठेवावा. या पक्ष्यांचे नक्की काही सांगता येत नाही. मात्र नेहेमी घराजवळ असणारे चिमणी व कावळा मात्र आपल्या चांगलेच जवळ येतात. आपल्याला ओळखतात. माझी एक मैत्रीण तर विशिष्ट पद्धतीने काव काव आवाज काढून कावळ्याला बोलावते. आणि तोही तिने आवाज दिला की लगेच येतो. माझ्या एका मैत्रिणीच्या घराच्या गॅलरीत पोपटाचा पिंजरा होता. तो आम्ही तिच्या घराच्या खालून गेलो की, मैत्रिणीच्या आईला सांगायचा. नंतर तिच्या घरी गेले, की त्या विचारायच्या तू आज अकरा वाजता कॉलेजला गेलीस ना? त्यांना कसे कळते? हा प्रश्न बरेच दिवस पडायचा. पण त्याचे उत्तर मला त्यांच्या घरात असताना मिळाले. दुसरी एक मैत्रीण त्या रस्त्याने जात होती. लगेच पोपट म्हणू लागला, ‘‘आई, सुरेखा चालली’’. आणि आम्ही दारावरून गेल्याचे यांना कसे कळते, याचे उत्तर मिळाले. आणि तो फक्त शिकवलेलेच बोलतो हे पण तितकेसे खरे नाही हे समजले. शिकवलेले तर बोलतो पण योग्य ती उत्तरे पण त्याच्या कडून मिळायची. माझ्या एका मावशीकडे असणारा पोपट, त्याला खायला दिले की तांदूळ नको गाजर दे म्हणायचा. असे वेगळे पदार्थ मागून घ्यायचा. एखादे दिवशी एकदम शांत बसायचा. त्याला काय झाले विचारले, की ‘‘अंघोळ घाल, अंघोळ घाल‘‘ असे ओरडत सुटायचा. एका मैत्रिणीच्या घरी मोर होता, तो त्याच्या समोर कॅमेरा नेला की लगेच पिसारा फुलवत असे. बहुतेक कॅमेऱ्याचा लाईट त्याला वीज चमकल्या प्रमाणे वाटत असावा. अशा काही आठवणी कायम स्वरुपी असतात. आणि हे प्राणी, पक्षी आपल्या आयुष्याचा एक भाग असतात.

# प्रकाशाच्या वाटेवर एक प्रांजळ आत्मकथन

ज्योतिर्मय साहित्य

नदी अखंडपणे वाहते वाळूच्या कणाबरोबर मागे सोन्याचे कण ठेवते त्याप्रमाणे आत्मकथनामध्ये अशा प्रसंगाचा सुंदर हार गुंफून तो साहित्य सरस्वादामध्ये वास्तव साहित्य सारस्वताच्या गळ्यात अर्पण करण्याचे कार्य आत्मकथनकार करीत असतो. असेच कार्य नारायण कुडलीकर यांनी केले आहे.

आत्मकथन हा साहित्याचा प्रकार मानवी जीवनातील अंतरंग उलगडणारा असतो. आयुष्याच्या शेवटच्या वळणावर असताना मागे वळून पाहिले की, माणूस आपल्या जीवनातील अनेक प्रसंग, सुखदुःखाचे, आनंदाचे मोठ्या विस्मयाने रंगवित असतो. नारायण कुडलीकर हे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील एक ज्येष्ठ अधिकारी. सहाय्यक अभियंता पदापासून अधिक्षक अभियंता अशा कितीतरी शिखर पदापर्यंत पोहोचल्यानंतर त्यांनी मागे वळून पाहताना लिहिलेले हे आत्मकथन खरोखर मनाला भिडणारे आहे. कुठल्याही आत्मकथनामध्ये निवेदनाची शैली, लेखकाची प्रामाणिक दृष्टी आणि जीवनातील चढउतारांना सामोरे जाताना लेखकाने अनुभवलेल्या प्रसंगाचे मनोज्ञसे वर्णन या तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. आत्मकथनामधील आणखी एक पैलू म्हणजे आत्मकथन किती प्रांजळ आहे, किती सोशिक आहे, किती वास्तव आहे, किती हृदयाला भिडणारे आहे या गोष्टी फार महत्त्वाच्या असतात. या सर्व पैलूंचा विचार करता, नारायण कुडलीकर यांचे प्रकाशाच्या वाटेवर हे आत्मकथन निश्चितच यशस्वी ठरले आहे असे संसाराच्या युद्धपटलावर म्हणता येईल. आत्मकथनाचे यश किंवा अपयश आत्मकथनातील निवेदनाचा प्रामाणिकपणा आणि त्या निवेदनातील अभिव्यक्तीची वस्तुनिष्ठता ही महत्त्वाची असते. या सर्व अंगाने विचार करता, मानवी मूल्ये घेऊन आपल्या जीवनातील घडून गेलेल्या घटनांविषयी प्रांजळपणे मागे पाहणारे आणि या घटनांबद्दल सूज्ञपणे निवेदन करणारे कुडलीकर यांचे आत्मकथन म्हणजे मराठी साहित्याला समृद्ध करणारा एक नवा वाङ्मय प्रकार होय. साधारणपणे विद्युत मंडळातील अभियंता हा त्यांच्या तांत्रिक घटना आणि घडामोडींमध्ये व्यग्र असतो. परंतु या तांत्रिक घटनांबरोबरच त्यांनी स्वतःच्या जीवनातील, समाजाच्या जीवनातील आणि सोबतीच्या माणसांच्या जीवनातील केलेले वर्णन खरोखरच लक्षणीय आहे. त्यामुळे त्यांचे हे आत्मकथन हृदयाला भावते, मनाला भिडते आणि जीवनाचा



## आस्वाद


प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
मोबाईल नं. ९२२५३१३५९२

अर्थ उलगडून दाखविते.

शैलीचा अद्भुत अविष्कारः

नारायण कुडलीकर यांच्या प्रांजळ निवेदन शैलीचा अभिनव अविष्कार कसा झाला आहे हे थोडेसे त्यांच्या मनोगतातून प्रकट होते. त्यांनी सुरुवातीला म्हटले आहे की, हरीविजय, पांडव प्रताप यासारखे धार्मिक ग्रंथ त्यांनी लहानपणी ऐकले, वाचले आणि अनुभवले आणि पुढे जाऊन शालेय जीवनामध्ये असताना त्यांनी अनेक कथा, कविता आणि प्रसंग लिहिले. शालेय पत्रिकातून तसेच काही वेळा वेगवेगळ्या प्रसंगाच्या निमित्ताने त्यांनी केलेले लेखन हे त्यांना मार्गदर्शक होते. प्राध्यापक लक्ष्मीकांत तांबोळी यांच्यासारख्या कुशल व सिद्धहस्त लेखकाने तू चांगला लिहितोस अशी त्यांना दिलेली शाबासकी स्फुरण देणारी होती. याही पेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यांनी त्यांच्या सभोवती असलेल्या माणसांचे जे वर्णन केले आहे ते मोठे गहिरे, अद्भुत आणि मनाला भिडणारे आहे. सभोवतीचे शिक्षक, त्यांच्याच कुटुंबातील त्यांचे भाऊ शिवाय कितीतरी जिवंत माणसांचे अनुभव प्रकट करताना त्यांच्यातला साहित्यिक फुलला आणि त्यांना असे वाटायला लागले की, बालपणीचा आणि शालेय जीवनातला हा सगळा अनुभवाचा भाग आपण साहित्यातून का आणू नये. अनुभवांची शिदोरी त्यांनी उकलली आहे ती आत्मकथनाच्या रूपाने आणि त्यातूनच त्यांचे आत्मकथन संथ, प्रवाही ओढ्यासारखे जिवंत आणि तेवढेच पारदर्शक बनले आहे.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये श्रीकांत उमरीकर यांनी लेखकाची बाजू उत्तम प्रकारे उचलून धरली आहे. नारायण कुडलीकर यांच्यातला एक छोटा सूर्य कसा अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करतो आणि त्यांच्या निवेदन शैलीचे वैविध्य आणि वेगळेपण कशात आहे हे सांगताना उमरीकर लिहितात, प्रकाशदाता सूर्याला सूर्यनारायण संबोधले जाते. योगायोगाने नारायण कुडलीकरांनी प्रकाशदानाचे काम करणाऱ्या विद्युत मंडळातच नोकरी केली. अशा या प्रकाशदांनी माणसाने अतिशय प्रामाणिकपणे आपल्या आयुष्याचे रेखाटलेले शब्दचित्र म्हणजे हे पुस्तक. या पुस्तकातील अनुभवांचे उभे आडवे धागे, त्यातील सुखदुःखांचे पदर आणि त्यातील मानवी जीवनातील चढउतार व यशाचे आलेख याचे केलेले मनोज्ञ दर्शन हा या ग्रंथाचा सगळ्यात मोठा जमेचा भाग होय, असे म्हणावे लागेल. या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे आहे की, त्यातील अभिव्यक्ती अत्यंत प्रांजळ आहे, ती सुलभ आहे आणि त्याचप्रमाणे ती कुठेही कृत्रिमता किंवा अवडंबर माजवित नाही. त्याला खोटा डौल नाही. साज आहे तो सुंदर अभिव्यक्तीचा. त्याला प्रभावी कोंदण लावले आहे ते त्यांच्या जिवंत प्रतिभेचे आणि त्याचा अविष्कार आहे तो लोकभाषेचा, लोक अभिव्यक्तीचा. त्यामुळे मराठवाड्याच्या सीमाभागातील म्हणजे देगलूर भागातील या कुटुंबातील जीवनाचे अनेक प्रसंग नारायण कुडलीकर यांनी मांडले आहेत. प्रथम पुरुषी, एकवचनी या आत्मकथनाची त्यांनी केलेली अभिव्यक्ती, तेथील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची सरमिसळ मोठ्या





अद्भुतपणे उकलून दाखविते हे त्याचे वेगळेपण होय.

या आत्मकथनाच्या पहिल्या भागात ग्रामीण जीवनात झालेले बदल लेखकाने उत्तम प्रकारे रंगविले आहेत. त्याही पेक्षा त्यांनी आपल्या कुडली गावापासून ते संभाजीनगरपर्यंत अभियांत्रिकी शिक्षणासाठी केलेली वाटचाल या भागात आलेली आहे. या भागातील काही महत्त्वाचे प्रसंग अत्यंत लक्ष्यभेदक आहेत. प्रकाशाच्या वाटेवर यातल्या पहिल्या भागातील मराठवाडा, तेलंगणा, कर्नाटक यांच्या सीमाभागातील लोकजीवनाचे फार मोठे यथार्थ चित्रण आले आहे. मरपळीहून येणारा ओढा आणि कुडलीच्या शिवारातील ओढा यांचा प्रितीसंगम होतो म्हणजे जणू हा कानडी आणि मराठी संस्कृतीचा सुरेख संगम आहे, असे देखील त्यांना म्हणावयाचे आहे. त्याशिवाय, आपल्या वडीलांनी आपल्या शेतामध्ये विहिर पाडली तेव्हाचा प्रसंग त्यांनी फार उत्तम प्रकारे रेखाटला आहे. शिवाय, त्यांच्या बहिणीच्या लग्नासाठी पाहुणे कसे आले, जाधव यांच्या वाड्यात पाहुण्यांची व्यवस्था कशी केली, लग्नाच्या प्रसंगी कशी कशी धावपळ झाली या सर्वांचे हुबेहूब चित्रण त्यांनी केले आहे. तिसरा प्रसंग तर हृदयाचा बांध फोडणारा आहे. कुठेतरी शाहगंजामध्ये गाय कापल्याचे निमित्त होते आणि नंतरच्या काळात अभियांत्रिकी महाविद्यालयाच्याजवळ ते राहत असलेल्या भागात गुंड हल्ले करतात आणि त्यांच्यावर खुद्द हा प्रसंग गुदरतो आणि त्यांना जखमी केले जाते.

तेव्हा हा प्रकार पाहून आजूबाजूचे लोक धावून येतात आणि त्यांची सुटका होते. हाही प्रसंग त्यांनी फार वस्तुनिष्ठपणे मांडला आहे. आत्मकथनामधील निवेदनातील प्रांजळपणा हा शांत, संयत आणि प्रगल्भ अविष्काराचा भाग असतो. या दृष्टीने विचार करता, नारायण कुडलीकर यांना अधिकचे गुण दिले पाहिजेत कारण त्यांनी निवेदनामध्ये विवेकभाव जागृत ठेवला आहे. वस्तुनिष्ठता कायम ठेवली आहे आणि आपली मांडणी त्याआधारे उत्तम प्रकारे केली आहे. **(क्रमशः)**

# तुझ विन माता मज कोण तारी..?

**ज्योतिर्मय साहित्य**

बालाघाट डोंगर समुहात, लातूर व नांदेडच्या सीमेलगत परभणी जिल्ह्यातील व गंगाखेड पासून १८ कि.मी. अंतरावरील श्री.रेणुकामातेचे श्रीक्षेत्र राणी सावरगांव हे गांव! डोंगराच्या कुशीत सुंदर गांव यात्रेकरुच्या मनातील जग्नमातेचं श्रध्दास्थान आहे! फार पूर्वी दळण वळणाच्या सुख सोई पासून वंचित होते. आज परभणी- अहमदपूर रोडवर २४ तास वाहनाची ये जा कायमच असते. जगदंबा मातेच्या दर्शनास कायमच रीघ लागलेली असते. त्यामुळे पुर्वी सारखं भव्य यात्रेचे स्वरुप दिसत नाही. निजामाच्या राजवटीत रजाकारांच्या जाचक वेदना सहन करत अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी संघर्ष केलेला आहे! दुर्गामातेचं अधिष्ठान असल्याने पराक्रमी, धाडसी वीर व्यक्तीचे हे गांव असल्याने तेंव्हा हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे प्रमुख केंद्र होते. हे क्षेत्र मातेच्या साडेतीन पीठाचा महिमा सांगणारे व श्रीक्षेत्र माहुरचे ठाणे म्हणून अतीप्राचिन म्हणून सर्व परिचीत आहे.


वर्षातून दोन उत्सव संपन्न होतात. एक वसंत ऋतूतील वासंतीक नवरात्र व दुसरे शरद ऋतूतील शारदीय नवरात्र. सध्या चैत्र पोर्णिमे पासूनच नवरात्राला आरंभ झाला. दररोज मध्यरात्री मोर, हरिण, परी, वाघ, नाग, अश्व,राजहंस, हत्ती,रेडा, गरुड इ. वाहना वर नयन रम्य छत्री व आदब्दागिरीत मिरवणूक याला छबीणा म्हणतात तो निघत असतो. वाद्य मातेच्या जयघोषात असलेल्या मिरवणूकीत रेणुका संस्थान चे विश्वस्त गळाकाटु परिवार प्रमुख मानकर्यांच्या येथे अग्रस्थानी व इतर मानकरी भुते,गुरव, जोशी, पाटील इत्यादी उत्साहात भक्तीने सहभागी असतात.

दिवट्या, पोत खेळत निघणारी मिरवणूक भक्तां च्या डोळ्याचे पारणे फेडत असते! अष्टमीच्या सूमुहूर्ता. तेलधुनी हा मुख्य विधी असतो.हा दि.२१/४/२०२५ रोजी संपन्न झालेला आहे. त्या दिवशी मंदिराच्या प्रांगणात भजन, पूजन, किर्तन, प्रवचन, गोंधळ मातेच्या नामाचा जागर असंख्य भक्त गणाच्या उपस्थितीत असतो. एकादशी च्या दिवशी गोंधळ सेवेने या उत्सवाची सांगता होते.




अश्विन शुध्द प्रतिपदेपासून शारदीय नवरात्राचा आरंभ होतो. नऊ दिवस भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन विश्वस्त गळाकाटू परिवारा कडून होते. अष्टमीच्या दिवशी रात्री अग्नीपूजन करुन होम पेटवून पूर्णाहूती दिली जाते. रात्रभर भजन, किर्तन प्रवचनाचे नियोजन असते. व विजया दशमीला रेणुका मातेची पालखी निघते त्यात भोई समाजाचा मान मोठा असतो. मातेचे इतर मानकरी सहभागी असतात. मिरवणूक मुळपेठ मातेच्या डोंगरावर व नंतर केदारेश्वर मंदिर मार्गे गांवाच्या पश्चिमेकडे जाते व वाजत-गाजत परत मंदिरात येते. मार्गावर सर्व ठिकाणी ग्रामस्थानकडून पालखीत असलेल्या मुर्तीचे औक्षण करतात. एकादशीच्या दिनी गोंधळ कार्यक्रमाने नवरात्राची सांगता होते ! दोन्ही उत्सव प्रसंगी नगारखान्यात सकाळ, दुपार व सायंकाळ च्या प्रहरी सनई चौघड्याचे स्वर वातावतरण भक्तीमय निर्माण करत असतात. वाद्याच्या स्वरात उत्सहाला भरती येते.




हेमाडपंथी स्थापत्यकले द्वारे जगदंबेच्या मंदिरात कांही शिलालेख पुरातन मंदिर इतिहासाची साक्ष देत असते. मंदिराच्या दक्षिण दिशेला भव्य कल्लोळ तीर्थ, दत्तात्रय, निलकंठेश्वरा, मारुती व चीरेबंदी बांधलेले परदेशी बाबाचे मंदिरे आहेत ! गांवाच्या पुर्व दिशेला १ कि.मी. डोंगर टेकडीवर या मूळपेठ मातेचे मंदीर व दक्षिण दिशेला श्री.केदारेश्वर मंदिरा मुळे नैसर्गिक सौंदर्या बरोबरच भक्ताच्या शाश्वत आनंदाचे पवित्र स्थळ आहेत. श्रावणी सोमवार व महाशिवरात्रीच्या प्रसंगी श्री केदारेश्वराच्या दर्शनाला खुप गर्दी असते.

रेणूकामातेच पंचक्रोशी व त्या बाहेरील भक्तगण नवसपूर्ती, भोगी अभिषेक, कुंकूम आर्चन, नव वर-वधू यात्रा इ. साठी येतात. निवासाच्या सोईसाठी आणि कार्यक्रमा निमित्य थांबण्यास यात्री निवासाची सोय, लग्न व मौंजीबंधन विधीसाठी मंगल कार्यालयाची उत्तम सुविधा उपलब्ध केलेली आहे ! मंदीर परिसरात विजेचा झगमगाट सोलार उर्जे द्वारे केलेला आहे. रेणुका मातेच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या गांवाचे गौतमी नदीमुळे गांवाचे २ भागात विभाजन झालेले आहे. त्यामूळे नैसर्गीक सौंदर्यात अधिकच भर पडलेली आहे. राणी सावरगाव म्हणजे शैक्षणिक व व्यापार व अर्थिक उलाढालीचे प्रमुख केंद्र निर्माण झालेले आहे !

एके काळी घनदाट जंगलात वास्तव्य असलेली मुख्य मंदिर व मूळपेठ मातेचा परिसर वृक्ष तोडी मुळे उजाड झालेला आहे. पण गांवातील पर्यावरण रक्षक असलेला व माझ्या दिवंगत वर्गमित्राचे सुपूत्र दयानंदआप्पा कूदमळे व त्याचे सहकारी मित्रमंडळाने चळवळीतून ३ वर्षा पासून मेहनत घेऊन माळावर लोक सहभागातून वृक्षारोपण करुन काया पालट केलेला आहे. वृक्षसंवर्धन करतांना अनंत अडचणी चा संघर्ष दयानंद करत आहे तो खुपचं कौतुकास्पद स्वरुपाचा आहे. त्याच्या प्रयत्नाचे वर्णन करायला माझ्या कडे शब्द संपदाच नाही. त्याचे वृक्ष संवर्धनाचे स्वप्न पुर्ण होवो हिच रेणूका माते चरणी माझी प्रार्थना!

# चला जगणे समजून घेऊ

**ज्योतिर्मय साहित्य**

स्वतः ची जगण्याची काही तत्वे असावीत. पण ती योग्य आणि पूरक असावीत जेणेकरून आपल्या मानवी जन्माचे सार्थक होईल. कोणी निंदो किंवा वंदो त्यामध्ये बदल होता कामा नये.



कधी उन्हाचा दाह तर कधी शितल स्पर्श करीत वाऱ्याची मंद झुळूक गारवा घेऊन येईल पण, ज्याने दाह हसत हसत सोसला त्यालाच ती झुळूक म्हणजे काय हे समजून जाईल.तो आनंद आतील जळमटे झटकून कायम मनाच्या कप्प्यात साठवता येईल.

कोणी स्तुती सुमने उधळावीत यासाठी कामात दिखावूपणा नसावा किंवा प्रसिद्धीसाठी हव्यासही नसावा. जे स्वीकारले आहे त्यात स्वतःला झोकून द्या. काही गोष्टी न मागताही तुम्हाच्या पुढे अनेक संधी आणि यश घेऊन येतील. आणि आपण कधी आयुष्याची कल्पना केली नसेल इतकं भरभरून आपल्याला मिळत राहील. पण ते यश मिळालं तर हुरळून न जाता पाय मात्र जमिनीवर असावेत. तरच तो आदर्श मानव डोळ्यासमोर उभा राहील ज्याला जगण्याचा खराच अर्थ कळला आहे.

प्रत्येक क्षणाचे मोल जाणून पुढे जात राहूयात. आजूबाजूला पूरक वातावरण नसेल तरीही स्वतःची वेगळी वाट निर्माण करूयात. कोणाचा द्वेष असूया, तुलना या गोष्टीपासून जाणीवपूर्वक लांब राहूयात.मनशांती राखण्यासाठी, वैचारिक प्रगल्भता येण्यासाठी जाणीवपूर्वक चांगली माणसं आणि पुस्तके यांच्या जवळ जाऊयात. एखाद्याचे विचार आपल्याला पटत नसतील तर त्याला बदलवत बसण्यापेक्षा त्यापासून लांब राहिलेलं कधीही चांगलं.कारण अनमोल वेळ उगाच वाया जातो.

स्वतःचं जगणं स्वतःच्या मुठीत घेऊन चला तर सारे मस्त जगूयात कारण हा क्षण आयुष्यात परत कधीच येणार नाही.

***

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

# अग्रवाल युवा मंचचा स्थापना समारंभ उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर**

– अग्रवाल युवा मंचचा भव्य पदस्थापना समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यामुळे आता नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या गतिमान मार्गदर्शनाखाली एका नवीन नेतृत्व युगाची सुरुवात झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी विविध सेवाभावी प्रकल्प राबविण्याचा निर्धार करण्यात आला.

अग्रवाल युवा मंचच्या अध्यक्षपदी आशिष भारुका यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना कोअर कमिटीमध्ये सचिव ॲड. प्रतिक अग्रवाल, खजिनदार श्लोक बागडिया, उपाध्यक्ष रवी गुप्ता, सहसचिव सीए अमित बगाडिया यांचा समावेश करण्यात आला.

विविध विभागांना नावीन्यपूर्ण आणि परिणामकारकतेने चालविण्यासाठी नियुक्त केलेले नवीन कार्यकारी संचालक आहेत. सांस्कृतिक संचालक अनिकेत अग्रवाल, युवा संचालक मधुर अग्रवाल, क्रिएटिव्ह डायरेक्टर चिन्मय गोयल, मानव संसाधन नंद अग्रवाल, टेक आणि डिजिटल आशिष मोर यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी जनसंपर्क (पीआरओ) टीमची घोषणा देखील करण्यात आली. शिवम भारुका, प्रशांत अग्रवाल, शुभम भारुका, नीरज गुप्ता, रौनक टकसाली यांचा समावेश यामध्ये आहे. समारंभाला अग्रवाल सभेच्या पालक मंडळाच्या मान्यवर सदस्यांची उपस्थिती होती. नूतन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अध्यक्ष कुंजबिहारी अग्रवाल, सचिव मनीष अग्रवाल, कोषाध्यक्ष दीपक बागडिया, उपाध्यक्ष किरण भारुका, सहसचिव प्रदीप बागडिया यांची उपस्थिती होती.

यावेळी अग्रसेन विद्या मंदिर शाळेचे अध्यक्ष सच्चीदानंद अग्रवाल, अग्रवाल पथपेढीचे सचिव ॲड. अनुप धानुका, महिला समिती सचिव रजनी बागडिया, उपाध्यक्ष वंदना बागडिया, बहु बेटी मंडळ अध्यक्षा शालिनी अग्रवाल यांची यावेळी उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष आशिष भारुका यांनी वर्षासाठी एक प्रेरणादायी रोडमॅप मांडला असून, धोरणात्मकदृष्ट्या चार तिमाहींमध्ये विभागला गेला. पहिल्या तिमाहीत यावर लक्ष केंद्रित केले जाईल. सर्व वयोगटातील लोकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन, वाहतूक सुरळीत करण्यासाठी आणि डावीकडे वळणाऱ्या वाहनांसाठी सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सिमेंट ब्लॉक बॅरिकेड्स उभारणे, शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी महापालिकेची शाळा दत्तक घेणे आणि नूतनीकरण करणे यासह भविष्यात अनेक कार्यक्रम घेण्यात येतील. अग्रसेन जयंती महोत्सव, कृष्ण जन्माष्टमी उत्सव, क्रीडा कार्निव्हल, आर्थिक जागरूकता कार्यक्रम, क्रिकेट स्पर्धा, युवा सक्षमीकरण, सांस्कृतिक विकास आणि सामुदायिक सेवेसाठी प्रयत्नशील अग्रवाल युवा मंचच्या मूल्यांचे आणि ध्येयाचे समर्थन करण्यासाठी सर्व पदाधिकारी प्रयत्नशील असतील, असा निर्धार यावेळी

# गौरवाचे आनंददायक क्षण....



प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था-महाराष्ट्र "आयोजित
१२ वे-राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन-पुणे २०२५, रविवार
दि.२०-०४-२०२५
आज दिवसभराच्या साहित्य संमेलनात प्रेक्षक-श्रोत्यांची भूमिका पहिल्या रांगेतल्या पहिल्या खुर्चीत बसून आनंदाने पार पाडली. कवी-कट्टा, गजल-कट्टा " दोन्ही कार्यक्रम बहारदार झाले. यात सादरीकरण -सहभागी सर्व कवी-गजलकरांचे अभिनंदन. या १२ व्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी-किशोरकुमार मिश्रा होते.
समूहाच्या संस्थापिका सौ.लीना देगलूरकर व कार्यकारिणी सदस्य तसेच संस्थेचे श्री.मकरंद घाणेकर हे या पुणे साहित्य संमेलनाचे आयोजक होते.
संमेलनाच्या दुसऱ्या भागात प्रज्ञा साहित्य पुरस्कार-२०२४" प्राप्त साहित्यिकांना व्यासपीठावरील मान्यवर व संमेलन-अध्यक्ष यांचे हस्ते शाल-श्रीफळ व सन्मानचिन्ह व मनस्वी हा मकरंद घाणेकर यांचा गजलसंग्रह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. साहित्य-स्पर्धेच्या परिक्षकांचाही सन्मान करण्यात आला.
यात बालसाहित्य विभाग परीक्षक "म्हणून माझाही सन्मान झाला व बालसाहित्य पुरस्कार "माझ्या हस्ते प्रदान केले गेले. साहित्यिकांच्या गाठी-भेटी, कविता-गजल "ऐकण्याचा आनंद यात कालचा रविवार साहित्य-आनंदात गेला.
सौ.लीना देगलूरकर, श्री.मकरंद घाणेकर, सौ.वंदना घाणेकर, कवियत्री ऋचा कर्वे, सौ.विनिता कदम, यांचा साभार उल्लेख करावा लागेल.
लेखन-स्नेही
- अरुण वि.देशपांडे-पुणे मो. 9850177342

# डी. डी. पाटील एक धडपडणारे व्यक्तीमत्व-ना.गिरीशभाऊ महाजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**जामनेर** – निवृत्ती नंतरचे जीवन आनंदी आणि सेवाभावी वृत्तीने कसे जगावे याचे आदर्श उदाहरण म्हणजे सेवानिवृत्त मुख्याध्यापक डी. डी. पाटील असून त्यांच्या रूपाने एक धडपडणारे व्यक्तिमत्व जामनेरात वास्तव्य करीत आहे आणि त्यांचा मला अभिमान वाटतो असे प्रतिपादन जलसंसाधन मंत्री नामदार गिरीश भाऊ महाजन यांनी पाटील यांच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाप्रसंगी केले. ना. महाजन यांच्या हस्ते सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. बी.एन.चौधरी यांनी संपादित केलेल्या अमृतयात्री डी डी पाटील या गौरव ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कडुबा ढमाजी पाटील, प्रा.बी.एन. चौधरी व रघुनाथ पुंडलिक पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. भंडारा उधळत आणि येळकोट येळकोट जय मल्हार हा जयघोष करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्याध्यापक व्हि. डी. पाटील यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मान्यवरांचा परिचय करून दिला. प्रदीप दिगंबर पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून सत्कारमूर्ती डी. डी. पाटील यांच्या जीवन कार्याचे आढावा घेऊन अमृत महोत्सव साजरा करण्याचे प्रयोजन स्पष्ट केले. त्यानंतर मंत्री ना. गिरिषभाऊ महाजन यांच्या हस्ते सत्कारमूर्ती डी.डी.पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.



या निमित्ताने उपस्थित मान्यवरांनी डि. डि. पाटील यांचा गौरवास्पद मनोगतं व्यक्त केली. त्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक म्हणून शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य त्याचप्रमाणे साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा वेध घेणारे मनोगत नाना लामखडे, सौ प्रतिभा चौधरी आणि प्रदीपभाऊ लोढा या मान्यवरांनी केले. त्यांनी पाटील यांच्या धैर्य, चिकाटी आणि सातत्याबद्दल मुक्तकंठाने कौतुक केले. खानदेशातील साहित्यिक प्रा. बी. एन. चौधरी यांनी अमृतयात्री या गौरव ग्रंथाचे संपादन करताना आलेल्या अनुभवातून डी.डी. पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले.

सत्काराला उत्तर देतांना डी. डी. पाटील भारावून गेले होते. ना. गिरीशभाऊ महाजन, संपादक प्रा. चौधरी, प्रकाशक युवराज माळी, कुटुंबिय, आप्तेष्ट, समाजबांधव आणि मित्रजनांचा स्नेह हीच माझी श्रीमंती असल्याचे सांगत त्यांनी उपस्थितांचे ऋण व्यक्त केले. शिक्षक, साहित्यिक ,समाज बांधव आणि तळागाळातील घटकांना एकत्र आणणारा समन्वयक म्हणून त्यांनी पाटील यांचा गौरव केला. कार्यक्रमाला जिल्हाभरातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पी. एल. महाजन यांनी तर आभार प्रदर्शन मनोज पाटील यांनी केले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559